ISBN NO. 978-81-924096-9-6

Sant Gadge Baba Amravati University Affilliated
Prabhu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal Tondgaon Sanchalit
**Matoshri Shantabai Gote Arts, Commerce & Science College,**
Washim-444505 (MS)
NAAC Accredited With 'B' Grade

U.G.C. SPONSORED TWO DAYS INTERDISCIPLINARY
NATIONAL SEMINAR ON

# HUMAN RIGHTS EDUCATION

- EDITOR -

**Asst.Prof.G.S. Kubade**

Dept.of Economics
Matoshri Shantabai Gote Arts, Comm. & Sci. College
Washim Dist. Washim (M.S.)

ISBN NO. 978-81-924096-9-6 (INTERDISCIPLINARY)

**HUMAN RIGHTS EDUCATION**

First Edition : 20/02/2015

**Editor**
**Asst.Prof. G.S. Kubade**
Head of Economics Dept.
Matoshri Shantabai Gote Arts,Comm.& Sci.
College, Washim (M.S)

**Publisher**
Principal
Matoshri Shantabai Gote Arts,Comm.& Sci.College,Washim (M.S.)

**Printers**
Mohan Printers
Washim

***Cover Page & Type Setting***
Dahore Printers,
Washim

**Note :**

The Publisher, Editor and the Board of Editors may or may not agree with the thoughts of the writers published in this souvenir. It is the sole responsibility of the writer in case of authenficity of their paper.

© *All the rights are reserved by publisher and organizer*

*Price : 300/-*

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | एकविसाव्या शतकातील मानवी हक्काची वास्तविकता (बीजभाषण) | प्रा. डॉ. सुभाष गवई | 1 |
| 2 | मानवी अधिकाराची पार्श्वभूमी | प्रा.डॉ. शिवप्रसाद पं. वायाळ | 6 |
| 3 | महिलांच्या विकासात मानवाधिकाराचे महत्व | प्रा.डॉ.शरद वाघोळे | 8 |
| 4 | मानव अधिकराचे महत्व | प्रा. सातव एस. एन. | 10 |
| 5 | मानवाधिकारांचे महत्व | डॉ.आर.डी.इंगोले | 12 |
| 6 | मानवी हक्काचे महत्त्व | अर्चना ना. धर्मे | 15 |
| 7 | मानवाधिकाराचे महत्व | प्रा.द.मु.ढवारे, प्रा.विजय जाधव | 18 |
| 8 | मानवाधिकार:एक विश्लेषण | प्रा. विजय आर गायकवाड | 21 |
| 9 | मानवी हक्काचा इतिहास व विकास | उध्दव शिवाजी जमधाडे | 26 |
| 10 | "मानवाधिकारांचे महत्व" | प्रा. डी. बी. पवार | 30 |
| 11 | " भारतीय महिलांच्या संरक्षणासाठी मानवाधिकाराचे महत्व" | प्रा. डॉ.एन. आर.वर्मा | 33 |
| 12 | "मानवी जीवनात मानवाधिकारांचे महत्त्व" | प्रा. डॉ. युवराज श्री. मानकर | 36 |
| 13 | मानवी हक्काची संकल्पना | डॉ. आर.के. काळे, प्रा.एस.एन. आकुलवार | 40 |
| 14 | मानवी हक्क : सर्वसमावेशक संकल्पना | प्रा.गजानन ब. घायाळ | 45 |
| 15 | " मानव अधिकारों का महत्व " | प्रा. इन्दु हरिवल्लभजी राठी जाजू | 48 |
| 16 | भारतीय संदर्भ में मानवाधिकार का महत्व | श्री गोटे पी.जे. | 51 |
| 17 | Human Right in India: Present Scenario. | Dr. Vijay Baburao Pande | 54 |
| 18 | Importance of Human Rights | Miss. Aruna S. Toshniwal | 58 |
| 19 | "Importance of Human Rights" | Dr. B.S. Pimple | 62 |
| 20 | Significance of Human Rights in Social Setup | Dr.B.S. Kavhar | 64 |
| 21 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | प्रा. रमेश वि. मोरे | 67 |
| 22 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | 70 |
| 23 | भारतीय संविधन आणि मानवाधिकार | प्रा. परळीकर शैलजा | 72 |
| 24 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | डॉ. संगीता एस. भुयार | 76 |
| 25 | भारतीय राज्यघटना व मानवाधिकार | प्रा. रजनीश बांबोळे | 78 |
| 26 | भारतीय संविधान आणि मानवी हक्क | प्रा. संजय निळकंठ पाटील | 81 |
| 27 | भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क | सहा.प्रा.अरविंद एन.बोहरपी | 87 |
| 28 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | प्रा. कविता ज्ञा. कावरे | 92 |
| 29 | भारतीय संविधानातील मानवाधिकाराशी संबंधीत कलमे. | डॉ. विपिन राठोड | 96 |

| अ.क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 30 | भारतीय संविधान आणि मानवी हक्क | प्रा. केशव सिताराम गोरे श्रीमती पंचफुलादेवी पाटील | 100 |
| 31 | भारतीय संविधान आणि मानवी हक्क | आर. एस. मडावी, ए. पी. राऊत, यु. एस. बनकर | 103 |
| 32 | मानव अधिकार आणि भारतीय संविधानातील मुलभुत हक्क | नाझमिन परवीन मो.नबी हसन लखारी | 108 |
| 33 | भारतीय सविधान आणि मानवाधिकार | प्रा. अनिल बी. वानखडे | 110 |
| 34 | भारतीय संविधान और मानवाधिकार | प्रा.अतुल एन.खोटे | 112 |
| 35 | भारतीय संविधान एवं मानवाधिकार | प्रा. पल्लवी रमेशराव देशमुख | 114 |
| 36 | हमारे मौलिक अधिकार और भारतीय संविधान | प्रा. कु. अंजुम नाहीद रऊफ खान | 116 |
| 37 | भारतीय संविधान में मानवाधिकारों का प्रावधान | प्रा.नारायण पोहकर | 118 |
| 38 | भारतीय संविधान और महिलाओ के मानवाधिकार | डॉ.पी.एस.सुर्यवंशी, प्रा.व्ही.बी.चांदजकर | 120 |
| 39 | Indian Constitution & Human Rights | Dr.Yogesh DadaraoUgale | 122 |
| 40 | Indian Constitution and Human Rights | Prof.Deepak.M.Buktare | 128 |
| 41 | Human Rights and Constitution of India | Asst. Prof. Deshmuk, R.K. Asst. Prof. Aradle S.D. | 134 |
| 42 | HUMAN RIGHTS AND INDIAN CONSTITUTION | Prof. A. D. JADHAO | 137 |
| 43 | भारतात बालकांच्या संरक्षणार्थ मानवाधिकाराची अंमलबजावणी | प्रा.उमेश आर. धुमाळे | 139 |
| 44 | बालकामगार आणि मानवी हक्क | सहा. प्रा. एस. एन. शिंदे | 141 |
| 45 | मानवी हक्क : महिला | प्रा. रावसाहेब शं. ठोके | 144 |
| 46 | मानवी हक्काचे वर्तमानकालीन प्रश्न: | प्रा. डॉ. क्षिरसागर बी. एस. | 149 |
| 47 | मानवाधिकार आणि विरोधाभास | प्रा.श्रीहरी रंगनाथराव पितळे | 153 |
| 48 | भारतीय समाजातील दुर्बल घटक आणि मानवाधिकाराची भूमिका | प्रा. पद्मानंद मनोहर तायडे | 156 |
| 49 | मानवी हक्क आणि भ्रष्टाचार | प्रा.संदिप भिमराव डोंगरे | 159 |
| 50 | मानवाधिकार व वास्तविक स्थिती | प्रा. तनय गोडे | 162 |
| 51 | स्त्रियांचे शोषण आणि मानवाधिकार | प्रा.कु. सुनिता तुकाराम राठोड (गोरे) | 167 |
| 52 | भारतातील मानवाधिकाराचे टिकात्मक परिक्षण एक अभ्यास | एस. एन. भदरगे, पी.व्ही.बुकणे, डि. एस. गोरे | 171 |
| 53 | आदिवासी आणि मानवाधिकार | प्रा. डॉ. प्रविण भास्करराव हाडे | 178 |
| 54 | मानवाधिकार आणि भारताती स्त्रियांचे शोषण | प्रा. संजय बबनराव चौधरी | 180 |
| 55 | मानवीहक्क व काळ्या स्त्रीयांचा मुक्ती लढा | प्रा.डॉ.लता रा.जावळे | 184 |
| 56 | स्वातंत्र्यांच्या संदर्भात मानवी लढा | प्रा.डॉ. गजानन जी. हिरवाळे | 190 |
| 57 | बालक आणि मानवाधिकार शिक्षा | प्रा.फिरोज एस. खान | 195 |
| 58 | मानव अधिकार और महिला | डॉ. सविता व्ही. रुक्के | 197 |
| 59 | "HUMANE APPROACH TOWARDS RIGHTS OF ACCUSED" | Dr. Vijesh B. Munot | 200 |

| अ.क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 60 | An Analysis of Right to Food in the Indian context | Dr. Usha N. Patil | 204 |
| 61 | HUMAN RIGHTS OF PERSONS SUFFERING FROM AIDS | Sushant D. Chimne | 210 |
| 62 | Assessment of Basic Human Rights of Self-employed Workers under Article 21 of Constitution of India | Dr. Suprabha P. Yadgirwar | 215 |
| 63 | JUDICIAL ACTIVISM IN PROTECTION OF RIGHT TO HEALTHY ENVIRONMENT IN INDIA | Prof. Sandeep C.Nagarale | 222 |
| 64 | Human Rights of Daily Rated Casual Labourers with special emphasis on their right to get regularised in the job- A Critique | Dr. Shrinaag A. Panchbhai | 226 |
| 65 | मानव विकास आर्थिक वृध्दीचे द्योतक | डॉ.संतोष नामदेवराव ताडे | 234 |
| 66 | मानवी हक्क : मानवी जीवनासाठी आवश्यक | माटे व्यंकटी गोविंदराव | 237 |
| 67 | मानव अधिकार आणि नव्वदनंतरच्या मराठी कवितेतील शेतकऱ्यांच्या व्यथांचे चित्रण | प्रा. विजय एम. जाधव | 239 |
| 68 | मानवी हक्क : शिक्षण | सुधिर ना. देशमुख | 244 |
| 69 | मानवी हक्काचे समताधिष्ठीत - मुल्य | प्रा.एन.आर.कनाके | 247 |
| 70 | आंबेडकरी साहित्यात मानवाधिकाराचे आविष्करण | डॉ. आर.पी. इंगळे | 249 |
| 71 | मानवाधिकार आणि समाज | सहा.प्रा.उन्मेश अजाबराव घुगे | 253 |
| 72 | शाहू महाराज आणि स्त्रीयांचे मानवाधिकार | प्रा. विनोद जे. राठोड | 255 |
| 73 | औद्योगीक क्रांती आणि मानवाधिकार | प्रा. भाऊराव रामेश्वर तनपुरे | 257 |
| 74 | मानवी हक्क व उच्च शैक्षणिक संस्थाची भुमिका | प्रा. पी.डी. शृंगारे | 261 |
| 75 | मानवी हक्क - आदिम म्होरकी - अनुबंध | प्रा.डॉ. अजय कृ. खडसे | 264 |
| 76 | पर्यावरणीय समस्या व मानवाधिकार | प्रा. दिलीप नि. लांजेवार | 269 |
| 77 | भारतीय संविधानामध्ये आदिवासी (अनुसुचित जमाती) चे मानवीय हक्क | सहा.प्रा.पूर्णिमा नारायण संधाणी | 272 |
| 78 | मानवी हक्काच्या संवर्धन व संरक्षणात स्वयंसेवी संस्थांची भूमिका | प्रा. भालेराव जे.के., प्रा.सोंडगे ता.प. | 276 |
| 79 | मानवी हक्क, शिक्षण | प्रा. एन.बी. मठपती | 279 |
| 80 | पोलीस आणि मानवाधिकार | प्रा. दिपक राघोजी दामोदर | 282 |
| 81 | भारतातील मानवी हक्क चळवळ एक अध्ययन | श्री संजय ज. गोटे | 286 |
| 82 | मुक्ती संकल्पनेचे व्यावहारीक रूप : मानवाधिकार | प्रा. पुरूषोत्तम शं. वानखडे | 287 |

# पोलिस आणि मानवाधिकार

**सहा. प्रा. दिपक राघोजी दामोदर.**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

मातोश्री शांताबाई गोटे महा वाशिम

भारत हे विश्वातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. सर्व प्रकारच्या राजकीय व्यवस्थांमध्ये लोकशाहीला सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त झाले आहे. त्याचा आधार लोकशाहीमध्ये नागरिकांना मिळालेले पर्याप्त अधिकार आणि सुविध ा हा आहे. त्यामुळेच अब्राहम लिंकन यांनी ''लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही. ''अशी लोकशाहीची व्याख्या केली आहे. या व्यवस्थेमध्ये जनहिताला सर्वोतोपरी महत्त्व दिले गेले आहे. जनहित म्हणजेच मानवाधिकार होय. भारतीय संविधानातील भाग 3 मध्ये कलम 12 ते 35 मध्ये नागरिकांच्या मुलभूत अधि ाकारांचे विश्लेषण आलेले आहे. एकूणच मानवाधिकाराचे विश्लेषण यामध्ये आढळते. या अधिकारांची जोपासणा करण्यामध्ये पोलिसांची भूमिका अनन्य साधारण महत्त्वाची आहे. नागरिकांच्या अधिकारांचे जतन करणे हे पोलिसांचे प्रथम कर्तव्य मानले जाते. समाज आणि पोलिस आपल्या उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी परस्परांवर अवलंबून असतात. दोघांच्या परस्पर सहकार्यातून एका सर्वांगसुंदर समाजाची निर्मिती करता येते. मात्र आज समाजामध ये अगदी उलट चित्र दिसून येत आहे. मानवी अधिकारांची जोपासना करणे हे ज्या यंत्रणेचे परम कर्तव्य आहे आज त्याच यंत्रणेकडून मानवाधिकाराचे मोठया प्रमाणात हनन होत असल्याचे दिसून येत आहे. त्यातून समाजाची शांतता व सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या समस्येवर प्रकर्षाने चर्चा होणे काळाची गरज बनली आहे.

**उद्दिष्टे :**

1) पोलिसांव्दारा होत असलेल्या मानवी हक्कभंगाचे स्वरूप स्पष्ट करणे

2) पोलिसांव्दारा होत असलेल्या मानवी हक्कभंगाचे कारणे स्पष्ट करणे.

3) पोलिसांच्या विविध समस्यांचा उलगडा करणे.

4) पोलिसांव्दारा होत असलेल्या मानवी हक्कभंगावर उपाययोजना सुचविणे.

**मानवाधिकार उल्लंघनाच्या सर्वाधिक तकारी पोलिसांविरूध्द**

सन 1993 ते 2013 या वीस वर्षाच्या कालावधीत राष्ट्रीय मानव आयोगाकडे एकूण12,84,856 एवढया मानवाधिकार उल्लंघनाबाबतच्या तक्रारी आल्या आहेत. यापैकी सर्वाधिक तक्रारी पोलिसांविरूध्दच्या आहेत. ज्यांचा आकडा तब्बल 3,77,316 एवढा आहे. ज्यांचे प्रमाण 29. 37 एवढे आहे. यापैकी 2,07,081तक्रारी कायदेशीर कारवाही करण्यास पोलिस अपयशी ठरल्याबाबतच्या आहेत. 99,577 तक्रारी पोलिसांव्दारे अधिकाराचा दुरूपयोग केल्याबाबतच्या आहेत. तर 70,703 तक्रारी पोलिसांनी खोटया गुन्हयांत गुंतविल्याबाबतच्या आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाव्दारा प्राप्त आकडेवारी नुसार 1992 मध्ये पोलिस कारवाईमध्ये एकूण 1045 सामान्य नागरिक मारले गेले आहेत. ज्यामध्ये दंगली नियंत्रण करतांना 534 तर अन्य घटनांमध्ये 511 नागरिकांचा बळी गेला आहे. 1993 मध ये पोलिस कारवाईमध्ये एकूण 468 सामान्य नागरिक मारले गेले. ज्यामध्ये दंगली नियंत्रण करतांना 354 तर अन्य घटनांमध्ये 114 लोकांचा बळी गेला आहे. 1994 मध्ये 137 तर 1995 मध्ये 111 लोक पोलिस कारवाईत सामान्य नागरिक मारले गेले आहेत. या चार वर्षाच्या आकडेवारीची सरासरी काढल्यास प्रत्येक दिवशी एक नागरिक पोलिस फायरिंगमध्ये मारला गेल्याचे विदारक चित्र समोर येते.

पोलिस ज्यांचे कार्य समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणारी यंत्रणा आहे,ज्यांचे प्रथम कर्तव्य नागरिकांच्या मानवाधिकाराचे जतन करणे हा आहे. आज मात्र त्यांच्याकडुनच मानवाधिकाराचे मोठया प्रमाणात हनन होत आहे. येथे रक्षकच भक्षक बनल्याचे दिसून येत आहे. ष्कुंपनाने शेत खाल्ले तर दाद न्यावी कुणाकडेष या उक्तीप्रमाणे सदर समस्येकडे दूर्लक्ष किंवा डोळेझाक करून चालणार नाही. सामान्य लोकांचा पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिवसेंदिवस गढूळ होत चालला आहे. पोलिसांवरील लोकांचा अविश्वास वाढत चालला आहे. समाजात सुव्यवस्थित व शांतीपूर्ण वातावरण निर्मितीसाठी पोलिस व समाज यांच्यात परस्पर सहकार्य असणे गरजेचे असते. मात्र आज पोलिस व समाज यांच्यात असमंजस्यांची स्थिती निर्माण झाली आहे. पोलिसांच्या हातून मोठया प्रमाणात मानवाधिकारचे हनन का होत आहे ? व ही समस्या सोडविण्यासाठी कोणते उपाय राबविले गेले पाहिजेत यावर चर्चा होणे काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा हाच मुख्य उद्देश आहे. पोलिसाव्दारा मानवाधिकार हननाची काही महत्वपूर्ण कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**पोलिसाव्दारा मानवाधिकार हननाची कारणे :**

**1ऋ पोलिसांमधील अपसंस्कृती :**

पोलिस कर्मचाऱ्यांची यशस्वीता त्याने किती लोकांना अटक करून त्याच्या चलानची संख्या किती आहे ? यावर मानली जाते. अपराध्याकडुन खरं वदविण्यासाठी थर्ड डिग्री हाच एकमेव पर्याय आहे अशाप्रकारची अपसंस्कृती पोलिसांमध्ये वाढतं चालली आहे. दररोज गुन्हेगारी जगताचे अगदी जवळून होणारे दर्शन त्यामुळे पोलिसांचा दृष्टिकोन नकारात्मक बनतो. हा नकारात्मक दृष्टीकोन सुध्दा पोलिसांमध्ये अपसंस्कृती वाढण्यास कारणीभूत ठरतो. ज्यामुळे पोलिसांकडून मानवाधिकारचे मोठया प्रमाणात हनन होत आहे.

**2 अतिरिक्त कार्यभार :**

पोलिसांकडून मोठया प्रमाणात होत असलेल्या मानवाधिकार हननाचे हे सुध्दा एक मुख्य कारण आहे. पोलिसांना दररोज 12 ते 14 तास काम करावे लागते. नैसर्गिक आपत्ती,दंगली,व्ही. आय. पी. सुरक्षा अदि प्रसंगी तर पोलिसांना 24–24 तास कार्य करावे लागते. अशा अतिरिक्त कामाचा कोणताही अतिरिक्त मोबदला त्यांना मिळतं नाही. भारत हा सांस्कृतिक विविधतेने नटलेला देश आहे. त्यामुळे भारतात सतत विविध धार्मिक सण–उत्सव,प्रवचन,शोभायात्रा यांचे मोठया प्रमाणात आयोजन केल्या जाते,अशा प्रकारच्या उत्सवामध्ये पोलिस यंत्रणा नेहमीच व्यस्त असते. या दरम्यान पोलिस आपले नातेदार किंवा कौटुंबिक कार्यामध्ये सहभागी होवू शकतं नाहीत. दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या व वाढते गुन्हेगारीचे प्रमाण यामुळे पोलिसांचे कामकाज वाढले आहे. पोलिसांची संख्या मात्र त्यातुलनेने वाढलेली दिसतं नाही. अतिरिक्त कार्यभारामुळे पोलिसांमध्ये सामाजिक दुरत्व निर्माण होउन त्यांच्यात मानसिक ताण–तणाव निर्माण होतात. अशा अवस्थेत पोलिसांकडून मानवाधिकारांचे उल्लंघन होणे स्वाभाविक ठरते.

**3) अत्यल्प वेतनः**

हे सुध्दा पोलिसांकडून मानवाधिकारचे मोठया प्रमाणात होत असलेल्या हननाचे एक मुख्य कारण आहे. सामान्य पोलिस शिपायाला चतुर्थ कर्मचाऱ्याच्या वेतनश्रेणी नुसार वेतन मिळते. जे अत्यल्प आहे. त्याचप्रमाणे पोलिसांना पदोन्नतीच्या संधी सुध्दा खूप कमी असतात. आर्थिक तंगी व अतिरिक्त कार्यभार यामुळे हतबल झालेला पोलिस शेवटी गैरमार्गाचा अवलंब करतात आणि मिळेल तेथून लाच स्वीकारण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी पोलिसांच्या हातून मोठया प्रमाणात मानवाधिकाराचे हनन होते.

**4) मानसिक खच्चीकरण :**

अतिरिक्त कार्यभारासोबत सदैव तणावाखाली काम करणाऱ्या पोलिसांवर त्याचे विपरित परिणाम होतात. पोलिसांमध्ि ल मानसिक ताण–तणाव दूर करण्यासाठी रिफ्रेशमेंट कोर्स राबविले गेले पाहिजेत. व्यायाम,योगा,प्रणायाम इत्यादींची पोलिसांना नितांत गरज आहे. मात्र पोलिसांना त्याऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बंगल्याची साफ–सफाई करणे,बागेतील घाण साफ करणे यासारख्या कामाला लावले जाते. कमी वेतन व गंभीर स्वरूपाच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे पोलिसांमध्ये निरूत्साह व निराशा निर्माण होते आहे. ज्यामुळे पोलिस भ्रष्टाचार तथा गैरमार्गाचा अवलंब करण्याकडे वळतात. त्याचप्रमाणे सततच्या बदल्यांमुळे पोलिसांचे मानसिक खच्चीकरण होते. अशावेळी पोलिसांच्या हातून मोठया प्रमाणात मानवाधिकाराचे हनन होते.

**5द्ध सुविधांचा अभाव :**

पोलिस स्टेशन मधील भवन,आवास,फर्निचर,स्टेशनरी,पाणी,वीज,टेलीफोन,दळण–वळण यासारख्या मुलभूत सुविधांचा अभाव पोलिसांमध्ये दिसून येतो. भोजन आणि आराम हया मानवाच्या मुलभूत आवश्यकता आहेत. त्यांची प्राथमिक स्तरावर पुर्तता होणे गरजेचे असते. मात्र पोलिस स्टेशन मध्ये अतिशय निकृष्ट दर्जाचे भोजन पोलिसांना मिळते. हिंदीमध्ये एक म्हणं आहेष्जैसा खाये अन्न वैसा हो जाये मनष्यानुसार पोलिसांकडून मानवाधिकाराचे उल्लंघन होणे स्वाभाविक आहे. बऱ्याच पोलिस स्टेशनमध्ये वाहनांचा अभाव असतो. त्यामुळे पोलिस घटनास्थळावर वेळेवर पोहू शकत नाही. अशावेळी परिस्थिती बिघडल्यास पोलिसांना जबाबदार मानले जाते. पौष्टिक भोजन,पुरशी झोप,स्वास्थ पुरक निवास,मनोरंजन,नियमित व्यायाम,तथा आरोग्य तपासणीच्या सोई यासारख्या सुविधांच्या अभावांमुळे पोलिस कर्मचारी गंभीर स्वरूपाच्या शारीरिक व मानसिक आजारास बळी पडतात. अशातच बऱ्याच पोलिसांना दारूचे व्यसन जडते. त्यातून पोलिसांच्या हातून मानवाधिकाराचा भंग होतो.

**6द्ध लोकांचा पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन :**

सामान्य लोकांचा पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन गढूळ व पूर्वग्रह दुषित आहे. भारतीय पोलिस भ्रष्ट,कामचुकार,आळसी,तथा कूर आहेत असे सामान्य जनतेला वाटते. सिनेमा किंवा इतर प्रसार माध्यमे समाजासमोर पोलिसांची केवळ नकारात्म छबी ठेवतात. पोलिस अमानवीय असतात त्यामुळे त्यांच्याशी शत्रुत्वचं काय तर मैत्री सुध्दा नको अशी सामान्यांची धारणा आहे. एक प्रश्न याठिकाणी उद्‌भवतो की,अशा प्रकारच्या सामाजिक छबीमध्ये एक पोलिस कर्मचारी किती उत्साहाने कार्य करेल? पोलिसांचे कार्यक्षेत्र तर समाज आहे. समाजाच्या सहकार्याची गरज पोलिसांना असते. मात्र समाज जर पोलिसांकडे दूषित दृष्टीने पाहतं असेल तर पोलिसांकडुन मानवाधिकाराचे हनन होणे स्वाभाविक आहे.

**7द्ध सुरक्षेचा अभाव :**

सर्व प्रकारची सुरक्षा ही मानवाची एक मुख्य गरज आहे. त्यानुसार पोलिसांना सुध्दा सर्व प्रकारची सुरक्षा मिळणे गरजेचे आहे. पोलिसांचा सरळ संबंध अराजक,कूर तथा राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांशी येतो. आपल्या कर्तव्याचा भाग म्हणुन पोलिस अशा अपराध्यांना अटक करून आवश्यक ती चौकशी करतात. या सर्व प्रकियांमुळे आपोआप पोलिस आणि अपराधी यांच्यात वैयक्तिक शत्रुत्व निर्माण होते. भारतात दरवर्षी शेकडो पोलिस कर्मचारी अशा अपराध्यांच्या हिंसेला बळी पडतं आहेत. एकीकडे सामान्य जनता अपराध्यांच्या विरूध्द बोलायला तयार नसते तर दुसरीकडे मात्र पोलिसांकडून कारवाहीची अपेक्षा केली जाते. आपल्या कर्तव्याच्या पश्चात पोलिस सुध्दा एक सामान्य नागरिक आहेत हे मात्र समाज विसरतो. अशावेळी पोलिसांना स्वतः व आपल्या कुटूंबाच्या सुरक्षेची चिंता

तावते. अशा अवस्थेत पोलिसांकडे दोन पर्याय असतात. एक तर अपराध्यांना जाउुन मिळणे किंवा मरायला तयार
सणे. अशा वेळी पोलिसांकडून मानवाधिकारचे हनन. होणे स्वाभाविक आहे.

वरील विश्लेषणावरून पोलिसांव्दारे कोणत्या कारणामुळे व कोणत्या अवस्थेत मानवाधिकाराचे हनन होते
स्पष्ट होते. याशिवाय भर्ती व प्रशिक्षणातील दोष,कार्यामध्ये इतर लोकांचा हस्तक्षेप,पुरेशा पर्यवेक्षणाचा अभाव
ासारख्या कारणांमुळे सुध्दा पोलिसांच्या हातून मानवाधिकाराचे उल्लंघन होते.

**निष्कर्ष :**

) मागील वीस वर्षात मानवाधिकार हननाच्या सर्वाधिक तक्रारी पोलिसांविरूध्द आहेत.
) सामान्य नागरिक व पोलिसांच्या परस्पर सहकार्यातून मानवाधिकाराचे जतन करता येते.
) पोलिसांना पुरेसा आराम व स्वस्थ मनोरंजनाची आवश्यकता आहे.
) पोलिसांच्या वाढत्या कार्यभाराला कमी करण्यासाठी वाढत्या लोकसंख्येसोबत पोलिसांची योग्य प्रमाणात भरती
ोणे गरजेचे आहे.

**ंदर्भ :**


) मानवाधिकार विश्वकोश 6 – डॉ. कृष्ण कुमार शर्मा,अर्जुन पब्लीकेशिंग हाउस,नई दिल्ली,2011
) मानवाधिकार विश्वकोश 4 – डॉ. कृष्ण कुमार शर्मा,अर्जुन पब्लीकेशिंग हाउस,नई दिल्ली,2011
) मानवी हक्क व जबाबदऱ्या – प्रा. चंद्रकांत मिसाळ,ओम व्हीजन ॲकेडमी,पुणे,2011
) दैनिक लोकमत – मंगळवार दि. 10 डिसें. 2013
) दैनिक लोकमत, मंथन – रविवार दि. 20 जुलै . 2013


□□□□□



SBN : 978-81-924096-9-6